राज्य योजना सन २०१८-१९ राज्य योजनांतर्गत योजना ग्राम परिसर व आदिवासी विकास कार्यक्रम (२४०६ १५२१) पूर्व पावसाळी कामांचा चालू बाब प्रस्ताव.

महाराष्ट्र शासन
महसूल व वन विभाग
शासन निर्णय क्रमांक : एफडीएम-२०१९/प्र.क्र.१३/फ-२
हुतात्मा राजगुरु चौक, मादाम कामा मार्ग,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२,
दिनांक :- २८ मार्च, २०१९

<u>वाचा</u> :-१) प्रधान मुख्य वनसंरक्षक (अर्थसंकल्प, नियोजन व विकास), महाराष्ट्र राज्य, नागपूर यांचे पत्र क्र.कक्ष-१/यो/इए/संवव्य/प्र.क्र.०१/१८-१९/२४५५, दि.२६.०३.२०१९.
२) मुख्य वनसंरक्षक (प्रा) ठाणे यांचे पत्र क्र. कक्ष-३(४)/योजना/नबाप्र/५०६ दि. १९.३.२०१९.
३) मुख्य वनसंरक्षक (प्रा) कोल्हापूर यांचे पत्र क्र.कक्ष-२/यो/संवव्य/१५६३ दि. २२.३.२०१९.
४) मुख्य वनसंरक्षक (प्रा) कोल्हापूर यांचे पत्र क्र.कक्ष-२/यो/संवव्य/१५६४ दि. २२.३.२०१९.
५) महसूल व वन विभाग, शासन निर्णय क्रमांक : एफडीएम-२०१९/प्र.क्र. १३/फ-२ दि. २६.२.२०१९.
६) वित्त विभाग, शासन परिपत्रक, क्र.अर्थसं-२०१९/प्र.क्र.४२/अर्थ-३, दि.०८.०३.२०१९.

<u>प्रस्तावना :-</u>

प्रधान मुख्य वन संरक्षक (अर्थसंकल्प, नियोजन व विकास) महाराष्ट्र राज्य नागपुर यांनी संदर्भाधीन क्र.१ च्या पत्रान्वये सन २०१८-१९ करिता राज्य योजनेअंतर्गत "ग्राम परिसर व आदिवासी विकास कार्यक्रम " (२४०६ १५२१) या योजनेंतर्गत ठाणे वनवृत्तातील पूर्व पावसाळी कामासाठी शासन निर्णय दि.२६.०२.२०१९ नूसार वाटप करण्यात आलेल्या रु.७२६.८९ लक्ष रक्कमेपैकी रु.१७३.३३ लक्ष निधीची बचत झालेली असून सदर बचत निधी ठाणे वनवृत्ताकडून कोल्हापूर वनवृत्तातील सांगली, सातारा व सावंतवाडी या वन विभागातील पूर्व पावसाळी कामांसाठी खर्च करण्यास मान्यता प्रदान करण्याबाबतचा प्रस्ताव सादर केला आहे.

२. राज्य योजनेअंतर्गत "ग्राम परिसर व आदिवासी विकास कार्यक्रम" (२४०६ १५२१) या लेखाशिर्षाखाली सन २०१८-१९ करिता एकुण रु. ५४६७.८८ लक्ष नियतव्यय मंजूर व अर्थसंकल्पित करण्यात आला असून सन २०१८ च्या पावसाळी अधिवेशनात रु. ३०००.०० लक्ष नियतव्यय पुरवणी मागणीद्वारे अर्थसंकल्पित करण्यात आला आहे. वित्त विभागाच्या दि.०८.०३.२०१९ रोजीच्या परिपत्रकास अनुसरुन महसूल व वन विभागाच्या दि.११.०३.२०१९ रोजीच्या ज्ञापनान्वये सन २०१८-१९ चे आठमाही सुधारीत अंदाज उपलब्ध करुन दिले असून सदर सुधारीत अंदाजाच्या मर्यादेत खर्च करण्यास विभागास प्राधिकृत करण्यात आले आहे. त्या अनुषंगाने सुधारीत अंदाजाच्या मर्यादेत सदर

योजनेअंतर्गत रु. ७९१६.६८ लक्ष निधी वितरणासाठी उपलब्ध करुन देण्यात आला आहे. शासन निर्णय दि.२६.०२.२०१९ नूसार ठाणे वनवृत्तातील पूर्व पावसाळी कामे करण्यासाठी एकूण ७२६.८९ लक्ष निधी वाटप करण्यात आला आहे. तथापि, मुख्य वनसंरक्षक (प्रा.), ठाणे यांनी संदर्भाधीन क्र. २ येथील दि.१९.०३.२०१९ च्या पत्रान्वये सदर योजनेअंतर्गत रु.७२६.८९ लक्ष अनुदानापैकी रु.१७३.३३ लक्ष निधीची बचत झालेली असल्याबाबत कळविले आहे.

३. तदनंतर मुख्य वनसंरक्षक (प्रा.), कोल्हापूर यांनी संदर्भाधीन क्र. ३ व ४ येथील दि.२२.०३.२०१९ च्या पत्रान्वये कोल्हापूर वनवृत्तातील सावंतवाडी, सांगली व सातारा या वन विभागातील पुर्वपावसाळी कामांसाठी निधी उपलब्ध करुन देण्याची विनंती केली आहे.

४. त्या अनुषंगाने मुख्य वनसंरक्षक (प्रा.), ठाणे यांच्याकडून सन २०१८-१९ करिता राज्य योजनेअंतर्गत "ग्राम परिसर व आदिवासी विकास कार्यक्रम" (२४०६ १५२१) या योजनेंतर्गत बचत झालेला रु.१७३.३३ लक्ष निधी कोल्हापूर वनवृत्तातील सावंतवाडी, सांगली व सातारा या वन विभागातील पूर्वपावसाळी कामांसाठी उपलब्ध करुन देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय :-

प्रधान मुख्य वन संरक्षक (अर्थसंकल्प नियोजन व विकास), महाराष्ट्र राज्य,नागपुर यांनी प्रस्तावित केल्यानुसार मुख्य वनसंरक्षक (प्रा.), ठाणे यांच्याकडून सन २०१८-१९ करिता राज्य योजनेअंतर्गत "ग्राम परिसर व आदिवासी विकास कार्यक्रम " (२४०६ १५२१) या योजनेंतर्गत बचत झालेला **रु.१७३.३३ लक्ष (०२ मजूरी- रु.१२९.९९ लक्ष व २१ साहित्य पुरवठा रु.४३.३४ लक्ष)** निधी कोल्हापूर वनवृत्तातील सावंतवाडी, सांगली व सातारा या वन विभागातील पूर्वपावसाळी कामांसाठी खर्च करण्यास नमुद अटी व शर्तीचे अधिन राहून मान्यता देण्यात येत आहे.

सदरहू शासकीय मान्यता खालील अटींच्या अधिन राहून देण्यात येत आहे.

१) प्रधान मुख्य वनसंरक्षक (वनबल प्रमुख), महाराष्ट्र राज्य, नागपूर यांनी सदर निधी या विभागाकडून मंजूर केलेल्या प्रस्तावातील क्षेत्र / कार्यक्रम / कामे यावरच खर्च होईल व कामाची द्विरुक्ती होणार नाही आणि मंजूर कामांव्यतिरिक्त कोणत्याही नवीन बाबीवर /नवीन क्षेत्रावर/ नवीन कामांवर खर्च करण्यात येणार नाही याची दक्षता घ्यावी.

२) सदरहू निधी वितरित करण्यापूर्वी प्रस्तावानुसार योजनेतील निश्चित केलेल्या कामांना सक्षम अधिका-यांची तांत्रिक व प्रशासकीय मंजूरी असल्याची व त्याचबरोबर सध्या वाटप करण्यात येणा-या अनुदानातून खर्च करताना यामध्ये कोणतीही वित्तिय अनियमितता होणार नाही याची दक्षता घ्यावी.

३) सदर योजनेकरिता वितरित केलेला निधी खर्ची पडल्यानंतर त्याचे उपयोगिता प्रमाणपत्र शासनास सादर करावे.

४) त्याचप्रमाणे वित्त विभागाच्या संदर्भ क्र.२ वरील दि.०२.०४.२०१८ रोजीच्या शासन परिपत्रकातील अटी व शर्तींची पूर्तता करण्यात येईल याची देखिल दक्षता घ्यावी.

५) सदर प्रस्तावांतर्गत करावयाच्या कामाचा खर्च मागणी क्र.सी-७, प्रधान शीर्ष २४०६ वनीकरण व वन्यजीव, पंचवार्षिक योजनांतर्गत योजना (बिगर आदिवासी उपयोजना) १०१(११) वनसंरक्षण, विकास व पुनर्निर्मिती, (११)(१०) ग्राम परिसर व आदिवासी विकास कार्यक्रम (संयुक्त वनव्यवस्थापन) कार्यक्रम (२४०६ १५२१) राज्य योजनांतर्गत योजना या लेखाशिर्षांतर्गत सन २०१८-१९ मध्ये उपलब्ध करुन देण्यात आलेल्या अनुदानामधून भागविण्यात यावा.

५. सदर शासन निर्णय वित्त विभागाच्या संदर्भ क्र.६ वरील दि.८.३.२०१९ रोजीच्या शासन निर्णयान्वये आणि वित्त विभागाचा शासन निर्णय क्र.विअप्र-२०१३/प्र.क्र.३०/२०१३/ विनियम, भाग-२, दिनांक १७.०४.२०१५ भाग पहिला, उपविभाग-३ अन्वये विभागास प्रदान करण्यात आलेल्या अधिकारास अनुसरुन निर्गमित करण्यात येत आहे.

६. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१९०३२८१४४२१७४७१९ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

Atul Ashok Kode

Digitally signed by Atul Ashok Kode
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Revenue and Forest Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=a12403ed93b05957cb29b7e95265d3ac52d366233b80405514f23a879132aeec, serialNumber=f0d5ee4c99cc9cbfa8761b3ddc7bd6650bad33302f33a35400ad5aad2291371a, cn=Atul Ashok Kode
Date: 2019.03.28 14:46:01 +05'30'

(अतुल कोदे)
सह सचिव (वने)
महसूल व वन विभाग

प्रति :-

१) प्रधान मुख्य वनसंरक्षक (वनबल प्रमुख), महाराष्ट्र राज्य, नागपूर.
२) प्रधान मुख्य वनसंरक्षक (अर्थसंकल्प, नियोजन व विकास) महाराष्ट्र राज्य, नागपूर.
३) सर्व अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक.
४) मुख्य वनसंरक्षक (प्रादेशिक), ठाणे व कोल्हापूर.
५) मुख्य वनसंरक्षक (धोरण व तंत्रज्ञान)/(संयुक्त वनव्यवस्थापन व नियोजन).
६) महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता/ लेखा परीक्षा), १/२ महाराष्ट्र राज्य, मुंबई/नागपूर.
७) सह सचिव / उप सचिव, वित्त विभाग (अर्थ-३) / (व्यय-१०), मंत्रालय, मुंबई-३२.
८) उप सचिव, नियोजन विभाग (१४७५), मंत्रालय, मुंबई-३२.
९) जिल्हा कोषागार अधिकारी, ठाणे व कोल्हापूर.
१०) ब-१ कार्यासन, महसूल व वन विभाग,मंत्रालय,मुंबई-३२.
११) निवडनस्ती, फ-२ कार्यासन,महसूल व वन विभाग, मंत्रालय,मुंबई-३२.